


# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर

जिल्हा सोलापूर - ४१३ ३०४ (महाराष्ट्र शासन स्थापित)

दूरध्वनी क्र. ०२१८६-२२४४६६/२२३५५० भक्तनिवास क्र. ०२१८६-२२८८८८

वेबसाईट : www.vitthalrukminimandir.org इमेल : eotemple@gmail.com





**सहअध्यक्ष**

श्री. गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज (औसेकर)

**सदस्य**

आ.श्री. रामचंद्र शिवाजी कदम
श्रीमती शकुंतला विजयकुमार नडगिरे
डॉ. दिनेशकुमार सदाशिव कदम
श्री. भास्करगिरी गुरु किसनगिरी बाबा
श्री. संभाजी हिरालाल शिंदे
श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर नामदेव देशमुख (जळगांवकर)
ॲड. माधवी श्रीरंग निगडे
श्री.ह.भ.प. प्रकाश रुस्तुमराव जवंजाळ
श्री. भागवतभुषण अतुलशास्त्री अशोकराव भगरे गुरुजी
श्री.ह.भ.प. शिवाजीराव सदाशिवराव मोरे

**कार्यकारी अधिकारी**

श्री. संजीव जाधव
अपर जिल्हाधिकारी, सोलापूर

**व्यवस्थापक**

श्री. बालाजी पांडुरंग पुदलवाड
नायब तहसिलदार

**लेखाधिकारी**

श्री. अनिल मल्लेशा पाटील


जावक क्र. :आस्था/६६५(२)  दिनांक : १५/१०/२०२२/

## जाहिर दरपत्रक

**विषय :-** कर्मचा-यांना गणवेश पुरवठा करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना गणवेश पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्यानुसार आपलेकडील दरपत्रक दि.३१/१०/२०२२ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात सादर करावीत. दरपत्रके उशिरा अथवा अपूर्ण असल्यास विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच मंदिर समितीच्या www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर मिळतील.

**स्वा/-**
**कार्यकारी अधिकारी,**
**श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि.सोलापूर.**

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना गणवेश पुरवठा करणेबाबत.**

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.**

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच मंदिर समितीच्या www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.३१/१०/२०२२ रोजी सायं.५.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक गणवेश पुरवठा करणेकामी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री.संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले व अपूर्ण दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत. गणवेश पुरवठा कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचारी संवर्ग | कर्मचारी संख्या | गणवेश प्रकार | एकूण गणवेश संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **पुरूष कर्मचारी** | | |
| ०१ | विभाग प्रमुख | १२ | सियाराम कंपनीचा शर्ट व पॅन्ट. | २४ |
| ०२ | लिपीक, पशुवैद्यकीय अधिकारी, रोखपाल, सीसीटीव्ही ऑपरेटर, स्थापत्य अभियंता, पुजारी, वाहन चालक. | ५६ | सियाराम कंपनीचा शर्ट व पॅन्ट. | ११२ |
| ०३ | इतर सेवक, सफाई कर्मचारी, तारतंत्री, प्लंबर, सुतार, परिवार देवता सेवक, परिवार देवता पुजारी. | १०७ | सियाराम कंपनीचा शर्ट व पॅन्ट (सफारीटाईप – एकच रंगाचा). | २१४ |
| | | **महिला कर्मचारी** | | |
| ०४ | लिपीक. | ०१ | सहावारी साडी ब्लाऊस पिससह. | ०२ |
| ०५ | लिपीक. | ०१ | ड्रेस मटेरीअल कापड सलवार, ओढणी व कुर्ता. | ०२ |
| ०६ | पुजारी | ०१ | नऊवारी साडी ब्लाऊस पिससह. | ०२ |
| ०७ | इतर सेवक, परिवार देवता सेवक, सफाई कर्मचारी, परिवार देवता पुजारी इ. | ६० | सहावारी साडी ब्लाऊस पिससह. | १२० |
| ०८ | सुरक्षा कर्मचारी. | ०३ | सहावारी साडी ब्लाऊस पिससह. | ०६ |

२. दरपत्रकात नमुद दर गणवेश कापड, शिलाई, लोगो व नाव छपाई, कर, जीएसटीसह नमुद करावा. इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

३. सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर व २% जीएसटी कपात केली जाईल.

४. सदर गणवेश पुरवठा कालावधी दि.०१/११/२०२२ ते दि.३१/१०/२०२३ असा राहील.

५. वरीलप्रमाणे कर्मचा-यांना प्रत्येकी दोन नग प्रमाणे गणवेश कापड शिलाईसह पुरवठा करावयाचे आहे. तथापि, प्रशासकीय कारणास्तव शिलाई न करता फक्त कापड खरेदी करण्याचे ठरल्यास कर्मचा-यांना शिलाई रक्कम देण्यात येणार आहे. त्यावेळी फक्त पुरवठाधारकाला कापड पुरवठा करता येईल.

६. गणवेश कापड सियाराम कंपनीचे उच्च दर्जाचे असावे. तसेच ड्रेस मटेरीअल, साडी ब्लाऊजपिससह उच्च दर्जाची असणे आवश्यक आहे.

७. दरपत्रकासोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, व्यवसाय परवाना, अनुभव प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, अनामत रक्कम इ. कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

८. सदर दरपत्रकासोबत रू.५,०००/- अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम मंदिर समितीच्या लेखा शाखेकडे रोखीने जमा करता येईल किंवा "कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर" या नावाचा डिडि जमा करता येईल.

९. दरपत्रक मंजुर झाल्यानंतर गणवेश कापडांचे नमुने सादर करणे आवश्यक आहे. गणवेश कापडाचा रंग व त्यांची क्वालिटी निश्चित झाल्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येईल. गणवेश शिलाई चांगल्या दर्जाची असली पाहीजे.

१०. पुरवठादाराने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराने या कार्यालयाच्या मागणीप्रमाणे गणवेशाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिल्यापासून एक वर्ष राहील.

११. मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे गणवेश पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या मालाची सुरक्षा अनामत रक्कम मंदिर समिती खाती जमा करणेत येईल. त्याबाबत समिती व्यवस्थापन निर्णय घेईल.

१२. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१३. पुरवठा करण्यात येणारे गणवेश खराब असल्याचे आढळून आलेस, त्याबाबतची तपासणी करून खात्री केल्यानंतर पुरवठाधारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१४. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१५. गणवेश पुरवठा करणेचे ठिकाण श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर आहे. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१६. मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहतील.

१७. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल. त्यांनी रक्कम रू.१००/- चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र जमा करणे आवश्यक आहे.

१८. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

---------------------//-------------------------

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**दरपत्रक फॉर्म**

**प्रति,**

**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**विषय** :- **गणवेश पुरवठा करणेबाबत.**

**फर्मचे नाव** :- -----------------------------------------------------------------

**पूर्ण पत्ता** :- -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

**मोबाईल क्रं.** :- -----------------------------------------------------------------

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरच्या कर्मचा-यांना गणवेश पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहेत.

| **अ. क्र.** | **पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल.** | **दर्जा / ब्रॅन्ड** | **दर रू. प्रति गणवेश /नग कापड, शिलाई व सर्वकरासहीत व पोहोचखर्चासह.** | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **दर रू. कापड प्रति नग** | **दर रू. शिलाई प्रति नग** | **एकूण** |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ०१ | शर्ट व पॅन्ट. | सियाराम | | | |
| ०२ | शर्ट व पॅन्ट (सफारीटाईप). | सियाराम | | | |
| ०३ | सहावारी साडी ब्लाऊस पिससह. | उच्च दर्जा | | | |
| ०४ | नऊवारी साडी ब्लाऊस पिससह. | उच्च दर्जा | | | |
| ०५ | ड्रेस मटेरीअल कापड सलवार, ओढणी व कुर्ता. | उच्च दर्जा | | | |

वरील दर श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च, शिलाईसह आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. सदर दराने आपल्या मागणीप्रमाणे गणवेश पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे गणवेश पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दि.----- /------/२०२२ **नाव, सही व शिक्का**

**सोबत:- (१) व्यवसाय परवाना (२) आधारकार्ड (३) पॅनकार्ड (४) अनुभव प्रमाणपत्र (५) जीएसटी प्रमाणपत्र (६) अनामत रक्कम रू.५,०००/- (डि.डि. किंवा रोखीने जमा केलेली पावती)**